Review Of Research
Vol. 3 | Issue. 11 | Aug. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X

Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती : एक अभ्यास

**वायसे गोवर्धन कल्याण[१] , महेश प्रभाकर देशमुख[२]**

[१]अर्थशास्त्र विभाग, बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.
[२]अर्थशास्त्र विभाग प्रमुख आणि संशोधन मार्गदर्शक, स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड.

***सारांश :-***

महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती एक अभ्यास या विषयाचे अध्ययन केले असता असे स्पष्ट होते की, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. तरी देखील या कृषी उत्पन्नाच्या प्रक्रियेतील महत्त्वपुर्ण घटकाकडे म्हणजे भूमिहीन शेतमजुरांकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे त्यांच्या संख्येतही वेगाने वाढ होत आहे. त्यामुळे शेतमजुरांच्या समस्या गंभीर बनत आहेत. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात त्यांना मिळणारी मजुरी ही (५० ते ७० रूपये) अत्यल्प आहे. हंगामी मजुरी, राहणीमानाचा दर्जा, अल्प कामाचे दिवस इत्यादीवरून महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती दयनीय आहे हे स्पष्ट होते.

***प्रस्तावना :-***

महाराष्ट्राच्या कृषीचा विकास हा उपासमार, घाम व रक्ताचा इतिहास होता आणि अजुनही आहे. कृषी विकासातुन ग्रामीण विकासाला एक नवी दिशा देण्याचा प्रयत्न करणारे एक राज्य म्हणुन महाराष्ट्र भारतात आघाडीवर आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेची भिस्त कृषीवरच आहे. भारतीय आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्रास अनन्य साधारण असे महत्त्व आहे. महाराष्ट्र अर्थव्यवस्थेत औद्योगिक उत्पादनाप्रमाणेच कृषी उत्पादनाचेही जास्त प्रमाण आहे. अशा कृषी व्यवसायाने मानवाला प्रारंभिक अवस्थेत जीवनमान व स्थैर्य प्राप्त करून दिले. मानवाची अन्नधान्याची गरज कृषी व्यवसायाकडून पूर्ण करण्यात येते. तसेच अनेक उद्योगांना कच्चा माल पुरवला जातो.[१] महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रामध्ये काम करणारा शेतमजुर हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण भागातील आर्थिक आणि सामाजिक जीवनाचा एक अभिन्न व महत्त्वपुर्ण घटक आहे. परंतु हा घटक विकासाच्या प्रक्रियेमध्ये दुर्लक्षित राहिला आहे. शेतमजुरांच्या संदर्भात माजी राष्ट्रपती श्री. संजीव रेड्डी यांनी मत व्यक्त केले आहे. त्यांच्यामते “भारतातील शेतमजुरांचा प्रश्न हा धुमसणारा ज्वालामुखी आहे. हा ज्वालामुखी केव्हाही जागृत होऊन लाव्हा फेकू लागेल.”[२] दिवसेंदिवस शेमजुरांचा प्रश्न हा गंभीर होत आहे. महाराष्ट्रातील शेतमजुरांची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. महाराष्ट्रातील शेतमजुर ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये सर्वाधिक मागे, सर्वाधीक शोषीत, सर्वाधिक उपेक्षित वर्ग आहे. कृषी क्षेत्रातील शेतमजुरांच्या समस्या जोपर्यंत यशस्वीपणे सोडविल्या जात नाहीत. तोपर्यंत कृषीक्षेत्रात वास्तविक आणि कायमस्वरूपी सुधारणा होऊ शकणार नाही.[३]

**शोध निबंधाची उद्दिष्टे**

१.शेतमजुरांचा अर्थ अभ्यासणे.
२.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या वाढीचा अभ्यास करणे.
३.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या मजुरी दराचा अभ्यास करणे.

**शोध निबंधाची गृहिते**

१.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे.
२.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांना मुजरी अल्प मिळते.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला असुन शोध निबंधातील विवेचन दुय्यम साधन सामग्रीवर अवलंबुन आहे. यासाठी विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, संकेतस्थळ (वेबसाईड) इत्यादींचा उपयोग केला आहे.

**अभ्यास विषयाचे महत्त्व**

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत औद्योगिक उत्पादनाप्रमाणेच कृषी उत्पादनाचेही जास्त प्रमाण आहे. कृषी उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये भूमिहीन शेतमजूर हा एक अविभाज्य घटक आहे. परंतु पुर्वीपासुन या घटकांकडे दुर्लक्ष होत गेले आहे. त्यामुळे या घटकावर संशोधन होणे गरजेचे वाटते. म्हणुन शोधनिबंधासाठी ‘‘महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थितीः एक अभ्यास’’ हा विषय निवडण्यात आला आहे.

**शेतमजुराचा अर्थ**

शेतमजूर या संकल्पनेत कोणाचा समावेश करावा हा प्रश्न निश्चितपणे सोडविणे कठीण आहे. म्हणुन शेतमजूर कोणाला म्हणावे या संदर्भात ढोबळमानाने असे सांगता येते की, उपजिवीकेचे साधन म्हणुन दुस-यांच्या जमिनीवार राबणा-या मजुराला शेतमजूर असे म्हणतात.

**१. पहिली शेतमजूर चौकशी समिती (१९५०-५१)**

या समितीनुसार ‘शेतमजूर म्हणजे असे मजूर की, जे मजुरीसाठी शेतीमध्ये पिकांचे उत्पादन करण्यासाठी काम करतात. तसेच त्यांना अर्ध्यावर्षा पेक्षा जास्त काळापर्यंत दुस-याच्या शेतीवर काम करावे लागते.’

**२. दुसरी शेतमजूर चौकशी समिती (१९५६-५७)**

या समितीने शेतमजुरांची व्याख्या विस्तृत स्वरूपात दिलेली आहे. या समितीनुसार ‘‘शेतमजूर म्हणजे असे मजूर की जे मजुरीसाठी दुस-याच्या शेतावर काम करतात. त्याचबरोबर शेती मधील काही इतर सहाय्यक कामे (पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इ. कामे) करतात.’’[४] त्यांना शेतमजूर असे म्हणतात.

**३. राष्ट्रीय ग्रामीण श्रम आयोग (१९८७)**

या आयोगानुसार भूमिहीन शेतमजुर म्हणजे असे शेतमजूर जे मुळात अकुशल व असंघटीत असुन त्यांच्याकडे जीवन जगण्यासाठी श्रमाच्या व्यतिरिक्त दुसरे काहीच नसते. त्यांना भूमिहीन शेतमजूर असे म्हणतात.[५]

**४. जनगणना रिपोर्ट (१९६१)**

सन १९६१ च्या जनगणना अहवालानुसार शेतमजूर म्हणजे असे मजुर की जे दुस-याच्या शेतीवर काम करतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या बदल्यात पैसा, वस्तू किंवा उत्पादनातील काही भाग मजूरी मिळते. परंतु शेतीच्या मालकी संबंधात शेतमजुरांना कोणताच अधिकार नसतो. शेतमजुर शेतातील उत्पादन व पेरणीकरण्यासाठी कोणताच निर्णय घेऊ शकत नाही. पिक विक्रीमध्ये देखील त्याचा वाटा नसतो.

**महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची संख्या**

महाराष्ट्र राज्य लोकसंख्येच्या बाबतीत देशात दुस-या क्रमांकावर आहे. प्रत्येक वर्गाचे आर्थिक व सामाजिक जीवन, देशाचा आणि राज्याचा आर्थिक विकास आणि लोकांचे कल्याण या गोष्टी लोकसंख्येशी निगडीत आहेत असे असले तरी वेगाने वाढणारी लोकसंख्या विकासातील एक अडथळा ठरू शकते. मर्यादित व कुशल अशा लोकसंख्येमुळे उत्पन्नात वाढ होऊन देशातील, राज्यातील जनतेच्या राहणीमानाचा दर्जा उंचावतो. परंतु देशातील उत्पादन वाढीच्या तुलनेत लोकसंख्येतील वाढ जलदगतीने होत असेल तर राष्ट्रीय उत्पन्न वाढुनही दरडोई उत्पन्नात घट होते.[६] त्यामुळे आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो.

महाराष्ट्रातील लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. तसेच अलिकडच्या काळात महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात झालेले यांत्रिकीकरणा त्यामुळे अकुशल शेतमजुरांचा रोजगार घटला आहे. म्हणुन महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत वेगाने वाढ होत आहे.

**तक्ता क्र. १**
**महाराष्ट्रातील जिल्हानिहाय भूमिहीन शेतमजुरांची संख्या (२००१-२०११)**

| अ.क्र. | जिल्हा | २००१ | २०११ | वाढ/घट | टक्के |
|---|---|---|---|---|---|
| १. | नंदुरबार | १८०००९ | ३५०६३० | १७०६२१ | ४.८४ |
| २. | धुळे | २०००४६ | ३६५८२८ | १६५७८२ | ४.७० |
| ३. | जळगाव | ५४६७६२ | ८०८८७२ | २६२११० | ७.४४ |
| ४. | बुलढाणा | ४००५३५ | ५३७९७० | १३७४३५ | ३.९० |
| ५. | अकोला | २७१६९२ | ३४०५८३ | ६८८९१ | १.९५ |
| ६. | वाशिम | १९४९६६ | २६५०६० | ७००९४ | १.९८ |
| ७. | अमरावती | ४२८६२५ | ५५२८२० | १२४१९५ | ३.५२ |
| ८. | वर्धा | १५७२२९ | २३३६०९ | ७६३८० | २.१६ |
| ९. | नागपूर | २४१६४८ | ३३८३५२ | ९६७०४ | २.७४ |
| १०. | भंडारा | १२५१४८ | १८२४३३ | ५७२८५ | १.६२ |
| ११. | गोंदिया | १०४७२७ | १४७३६६ | ४२६३९ | १.२१ |
| १२. | गडचिरोली | ८६२७३ | १३०११२ | ४३८३९ | १.२४ |

Review Of Research
Vol. 3 | Issue. 11 | Aug. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.net

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | चंद्रपूर | १९०१७२ | ३०३०५७ | ११२८८५ | ३.२० |
| १४. | यवतमाळ | ४३१२३४ | ६३३१४५ | २०१९११ | ५.७३ |
| १५. | नांदेड | ३४९८७६ | ५३९५८८ | १८९७१२ | ५.३८ |
| १६. | हिंगोली | १४६८२२ | १९८४९४ | ५१६७२ | १.४६ |
| १७. | परभणी | १९८४३८ | २८८४३८ | ९०००० | २.५५ |
| १८. | जालना | १७९३३६ | २६१७१३ | ८२३७७ | २.३३ |
| १९. | औरंगाबाद | २१६७७६ | ३५१६७९ | १३४९०३ | ३.८२ |
| २०. | नाशिक | ४०६६८७ | ६४४०५२ | २२७३६५ | ६.७३ |
| २१. | ठाणे | १७६०३० | २७३२१८ | ९७१८८ | २.९७ |
| २२. | मुंबई (बृम्हण) | २२३४ | १७६२१ | १५३८७ | ०.४३ |
| २३. | मुंबई | ७३६ | ५०८६ | ४३५० | ०.१२ |
| २४. | रायगड | ७६०६७ | ११५२५० | ३९१८३ | १.११ |
| २५. | पुणे | २७७७३२ | ३६६०१० | ८८२७८ | २.५० |
| २६. | अ. नगर | ३५८९२५ | ५०१८७३ | १४२९४८ | ४.०४ |
| २७. | बीड | २१३१७० | ३२७८३० | ११४६६० | ३.२५ |
| २८. | लातुर | २४२०४१ | ३८३९३९ | १४१८९८ | ४.०१ |
| २९. | उस्मानाबाद | १९६५८२ | २६५१६७ | ६८५८५ | १.९४ |
| ३०. | सोलापूर | ३७७३९४ | ५०८१४१ | १३०७४७ | ३.७१ |
| ३१. | सातारा | १८५२२९ | २४३६८७ | ५८४५८ | १.६५ |
| ३२. | रत्नागिरी | ४५१२८ | ९७१४६ | ५२०१८ | १.४६ |
| ३३. | सिंधुदुर्ग | २३९६३ | ३६५४३ | १२५८० | ०.३५ |
| ३४. | कोल्हापूर | ११७४९७ | २०७७९० | ९०२९३ | २.५६ |
| ३५. | सांगली | १९६५८२ | २४५८२६ | ४९२४४ | १.४० |
| | **एकुण** | **७५४६३११** | **११०६८९२८** | **३५२२६१७** | **१००** |

**Source:- www.censusindia.gov.in**

तक्ता क्र.१ मध्ये महाराष्ट्रामधील सन २००१ व २०११ या काळातील भूमिहीन शेतमजुरांची जिल्हानिहाय संख्या दर्शवलेली आहे. सन २००१ मध्ये महाराष्ट्रामध्ये एकुण ७५४६३११ एवढी भूमिहीन शेतमजूर होते. त्यामध्ये वाढ होऊन सन २०११ मध्ये ११०६८९२८ एवढे झाले. या कालखंडामध्ये महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्यत ३५२२६१७ एवढी वाढ झाली. महाराष्ट्रातील जिल्हानिहाय संख्येचा विचार करता. सर्वाधिक वाढ जळगाव जिल्ह्यामध्ये झाली सन २००१ मध्ये ५४६७६२ एवढी शेतमजुरांची संख्या होती. त्यामध्ये वाढ होऊन सन २०११ मध्ये ८०८८७२ एवढी झाली. म्हणजेच २६२११० एवढी शेतमजुरांची संख्या वाढलेली आहे. या वाढीचे महाराष्ट्रातील एकूण भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येशी प्रमाण ७.४४ टक्के एवढे आहे. त्या खालोखाल नाशिक, नांदेड, यवतमाळ, धुळे, नंदुरबार, लातुर, अ.नगर आणि बीड या जिल्ह्याच्या वाढीचे प्रमाण अनुक्रमे ६.७३ टक्के, ५.३८ टक्के, ५.७३ टक्के, ४.७० टक्के, ४.८४ टक्के, ४.०१ टक्के, ४.०४ टक्के आणि ३.२५ टक्के होय. महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत सर्वाधिक कमी वाढ मुंबई जिल्ह्याची झालेली आहे. सन २००१ मध्ये येथील भूमिहीन शेतमजुरांची संख्या ७३६ एवढी होती. त्यामध्ये अल्पशी ४३५० वाढ होऊन सन २०११ मध्ये ५०८६ एवढी झाली. या वाढीचे एकूण भूमिहीन शेतमजुरासी प्रमाण ०.१२ टक्के एवढे आहे. मुंबई जिल्ह्यामध्ये सर्वाधिक कमी वाढ होण्याचे कारण म्हणजे मुंबई हा सर्व दृष्टीकोनातुन विकसित जिल्हा आहे. तेथे औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणावर आहे. देशाची आर्थिक राजधानी आहे. म्हणुन तेथे अल्प वाढ होणे सहाजिक आहे.

थोडक्यात महाराष्ट्रातील लोकसंख्येत ज्या प्रमाणे वाढ होत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत वाढ होत आहे हि लक्षणीय बाब आहे. आज महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर भूमिहीन शेतमजूर आहेत. त्यांच्या वाढत्या संख्येमुळे अनेक समस्या निर्माण होतात. त्यामध्ये रोजगारीची समस्या, अन्नधान्याची समस्या आणि वाढती महागाई यामुळे भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती खालावत चालली आहे.

### महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची मजुरी

महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक परिस्थिती म्हणावी तेवढी चांगली व उच्च दर्जाची नाही. कारण येथील शेतमजुरांना काही दिवस म्हणजे हंगामी काम मिळणे आणि इतर हंगामात बेकार रहावे लागते. त्याच प्रमाणे मिळणारी मजुरी देखील अल्प प्रमाणात मिळते. उपभोग खर्च जास्त आणि उत्पन्न कमी अशी अवस्था महाराष्ट्रातील शेतमजुरांची आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती हीन दर्जाचा आहे.

**तक्ता क्र. २**
**महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची सरासरी मजुरी (मजुरी रूपयामध्ये)**


| अ.क्र. | कालखंड | पुरूष शेतमजूर प्रतिदिन मजुरी | स्त्री शेतमजूर प्रतिदिन मजुरी |
|---|---|---|---|
| १. | १९६०-६१ | २.२१ | १.८८ |
| २. | १९७८-७९ | ६.१४ | ४.०९ |
| ३. | १९९७-९८ | ९.२५ | ७.५० |
| ४. | २००४-०५ | ४०.१५ | २०.३५ |
| ५. | २०११-१२ | ७०.०० | ५०.०० |

**Source :** 1. Maharashtra Resean and Crop Report.

२. श्रम आणि रोजगार मंत्रालय, भारत सरकार, वार्षिक अहवाल (२०११-१२).

Review Of Research
Vol. 3 | Issue. 11 | Aug. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.net

**आलेख क्र. १**




तक्ता क्र. २ आणि आलेख क्र. १ वरून असे दिसुन येते की, सन १९६०-६१ मध्ये महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांचे मजुरीचे दर पुरूष शेतमजुरांना २.२१ रूपये प्रतिदिन तर स्त्री शेतमजुरांना १.८८ रूपये प्रतिदीन एवढे होते. हे मजुरीचे दर फारच नगन्य आहेत. यामध्ये अल्पशी वाढ होऊन सन १९७८-७९ मध्ये पुरूष शेतमजुरांची प्रतिदीन मजुरी ६.१४ रूपये तर स्त्री शेतमजुरांची मजुरी ४.०९ रूपये एवढी होती. सन १९९७-९८ मध्ये या मजुरी दरामध्ये काही प्रमाणात वाढ होऊन पुरूष शेतमजुरांची मजुरी ९.२५ रूपये तर स्त्री शेतमजुरांची मजुरी ७.५० रूपये प्रतिदीन होती. अलिकडच्या काळामध्ये सन २०११-१२ मध्ये पुरूष शेतमजुरांची मजुरी ७० रूपये प्रतिदीन आहे. आजच्या काळात देखील भूमिहीन शेतमजुरांना मिळणारी शेतमजूरी अल्प आहे. कारण किमान वेतन कायद्यान्वे प्रतिदिन ९५.६५ रूपये मजुरी द्यावी असे निश्चित केलेले असतांना देखील प्रत्यक्षात शेतमजुरांना ५० ते ७० रूपये प्रतिदिन मजुरी दिली जाते. म्हणजेच मिळणारी मजुरी ही अल्प आहे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी असते. आजच्या महागाईच्या काळात उपभोग खर्च जास्त असल्यामुळे भूमिहीन शेतमजुर कर्जबाजारी होतात. एकंदरीत महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती चिंताजनक आहे हे यावरून स्पष्ट होते.

**महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती**

महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती औद्योगिक क्षेत्रातील मजुरांपेक्षा दयनीय आहे. औद्योगिक क्षेत्रातील कामगार संघटीत असल्यामुळे त्यांना वेतनवाढ व इतर मागण्या मान्य करून घेता येतात. रोज काम मिळेल याची

शास्वती त्यांना असते. परंतु शेतमजुरांचे तसे नाही भूमिहीन शेतमजुर असंघटीत असल्यामुळे त्यांची सौदाशक्ती कमी असते. त्यामुळे त्यांना अल्प मजुरी मिळते. तसेच रोजगाराची शास्वती नसते. इतर कोणत्याही सवलती शेतमजुरांना मिळत नाहीत.[७]

महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती काही घटकावरून स्पष्ट होते.

**१. शेतमजूरांची हंगामी बेरोजगारी**

भूमिहीन शेतमजुरांना वर्षभर काम मिळत नाही. आज काम मिळाले तर उद्या काम मिळेल याची शास्वती त्यांना नसते. तसेच पुर्णवेळ काम मिळेल याची खात्री नसते. यामुळे त्यांना आपला उदरनिर्वाह भागविणे कठीण जाते. म्हणुन भूमिहीन शेतमजुरांना बेरोजगारीसारख्या समस्येला तोंड द्यावे लागते. परिणामी हा वर्ग औद्योगिकीकरण झालेल्या शहराकडे किंवा हंगामी रोजगारासाठी ऊसतोडणी कामगार म्हणुन एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतर करतात.

**२. अल्प मजुरी दर**

औद्योगिक कामगारांच्या तुलनेमध्ये भूमिहीन शेतमजुरांना त्यांचा कामाचा अत्यल्प मोबदला मिळतो. सन १९६०-६१ मध्ये पुरूष शेतमजुरांचा मजुरीचा दर २.२१ रूपये तर स्त्री शेतमजुरांचा दर १.८८ रूपये एवढा होता. म्हणजे मिळणारा मोबदला हा अत्यल्प आहे. सन २०११-१२ मध्ये महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांना ५० ते ७० रूपये प्रतिदिन मजुरी दिली जाते. आजच्या महागाईच्या कालखंडात हा दर अत्यल्प आहे हे स्पष्ट होते.

**३. प्रत्यक्ष कामाचे दिवस**

भूमिहीन शेतमजुरांना अत्यल्प रोजगार मिळत असल्याने त्यांना वर्षातील अनेक दिवस बेरोजगार रहावे लागते आणि या बेकारीच्या काळात ते इतर ठिकाणी रोजगार मिळण्यास असमर्थ असतात. सन १९५६-५७ मध्ये पुरूष शेतमजुरांना २३७ दिवस तर स्त्री शेतमजुरांना १६८ दिवस काम मिळत असे इतर दिवशी त्यांना बेरोजगार रहावे लागत असे. या कामाच्या दिवसामध्ये सातत्याने घट होऊन सन २०११-१२ मध्ये पुरूष शेतमजुरांना २१० दिवस तर स्त्री शेतमजुरांना १६० दिवस रोजगार मिळतो. म्हणजेच कामाचे दिवस कमी झाले. त्यामुळे मिळणारे उत्पन्न कमी झाले. परिणामी आर्थिक स्थिती चिंताजनक बनली आहे.

**४. कर्जबाजारीपणा**

मजुरीचा अल्प दर, हंगामी बेरोजगारी आणि परंपरेने मिळालेला दारिद्र्याचा वारसा या कारणामुळे भूमिहीन शेतमजुरांना इतर कार्यासाठी, उपभोगासाठी सावकाराकडून कर्ज घेतल्याशिवाय पर्याय नसतो. महाराष्ट्रात सर्वात जास्त शेतमजूर कर्जबाजारी आहेत. सन १९५०-५१ मध्ये भारतामध्ये ४५.०५ टक्के शेतमजुर कुटुंबे कर्जबाजारी होते. महाराष्ट्रात यापेक्षा वेगळे चित्र नव्हते. सन १९५६-५७ मध्ये कर्जबाजारी शेतमजुरांच्या कुटुंबाचे प्रमाण ६३.०९ टक्के होते. हे प्रमाण वाढतच जाऊन सन २००१ मध्ये कर्जबाजारी शेतमजुरांच्या परिवाराचे प्रमाण ८० टक्के होते. आज हे प्रमाण ८० टक्क्यापेक्षा ही वाढले आहे. म्हणजे सर्वच भूमिहीन शेतमजूर कुटुंब कर्जबाजारी असतात असे म्हणावे लागेल. यावरून असे स्पष्ट होते की, भूमिहीन शेतमजूर कर्जातच जन्मतो कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो. म्हणुन भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती हालाखीची आहे हे स्पष्ट होते.

**५. राहाणीमानाचा दर्जा**

शेतमजुरांना मिळणारे अल्प वेतन, अपूर्ण रोजगार यामुळे त्यांच्या जीवनावश्यक गरजाही पुर्ण होऊ शकत नाहीत. किमान जीवन पातळी गाठण्यासाठी आवश्यक तेवढे उत्पन्नही मिळत नाही. दुस-या शेतमजूर चौकशी समितीला असे आढळुन आले की, शेतमजुरांच्या कुटुंबाचा किमान उपभोग आणि उत्पन्न यामध्ये १८० रूपयाची तुट पडते. शेतमजुरांना आपल्या उत्पन्नातुन आपल्या कुटुंबांच्या दैनंदिन गरजाही पूर्ण करणे शक्य होत नाही. घरातील सर्व सदस्यांना दुस-याच्या शेतावर काम करूनही निकृष्ट जीवन जगावे लागते.[८]

**सारांश**

**निष्कर्ष**

१.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सन २००१ मध्ये महाराष्ट्रातील शेतमजुरांची संख्या ७५४६३११ एवढी होती. त्यामध्ये वाढ होऊन सन २०११ मध्ये ही संख्या ११०६८९२८ एवढी झाली आहे. झालेली वाढ ही लक्षणीय आहे.
२.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या मजुरीचा दर हा अतिशय अल्प आहे. सन १९६०-६१ मध्ये पुरूष शेतमजुरांच्या मजुरीचा दर २.२१ रू. एवढा होता. तर स्त्री शेतमजुरांच्या मजुरीचा दर १.८८ रूपये एवढा होता. यामध्ये काही प्रमाणात वाढ होऊन सन १९९७-९८ मध्ये पुरूष शेतमजुरांचा मजुरीदर ९.२५ रूपये तर स्त्री शेतमजुरांचा मजुरीदर ७.५० रूपये एवढा होता. यामध्ये वाढ होऊन सन २०११-१२ मध्ये हे प्रमाण अनुक्रमे ७० रूपये आणि ५० रूपये एवढे होते.ते आजच्या जागतिकीकरणाच्या काळात अल्प आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती दयनीय आहे.
३.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या कर्जबाजारीपणामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.
४.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांचे मजुरी दर अल्प असल्यामुळे त्यांचे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे त्यांचा राहणीमानाचा दर्जा निकृष्ठ आहे.
५.महाराष्ट्रातील भूमिहीन शेतमजुरांच्या कामाच्या दिवसामध्ये सातत्याने घट होत आहे. त्यामुळे त्यांना बेकारीत जीवन जगावे लागते.

**शिफारशी**

१.भूमिहीन शेतमजुरांना प्रशिक्षण देऊन कुशल कामगार बनवणे.
२.सन १९४८ च्या किमान वेतन कायद्याची ग्रामीण भागामध्ये प्रभावी अमंलबजावणी करणे.
३.भूमिहीन शेतमजुरांना जमिनीचे वितरण करणे.
४.भूमिहीन शेतमजुरांना कर्ज पुरवठ्यासाठी शेतमजूर सहकारी संस्थाची स्थापना करणे.
५.ग्रामीण भागामध्ये रोजगारांच्या संधी उपलब्ध करण्यासाठी रोजगार कार्यक्रमाची प्रभावी अमंलबजावणी करणे.

**संदर्भ सुची**

१.साळुंके आर.एस.; महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (२००३); कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, पृ.क्र. १४.
२.देशमुख प्रभाकर; भारताची अर्थव्यवस्था (१९८७); पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिकेशर्स, नागपुर पृ.क्र. १५१.
३.मिश्र जे.पी.; कृषी अर्थशास्त्र (२००९); साहित्यभवन पब्लिकेशन्स, आगरा पृ.क्र. १५५-१५६.
४.Gupta P.K.; Labour Economics (2012); Vrinda Publications, Delhi, Page No. 296.
५.त्रिपाठी विशाल; भारतीय अर्थव्यवस्था (नियोजन एवं विकास) (२०१२); किताब महल प्रकाशन; अलाहाबाद, पृ.क्र. ३५.

६.बिराजदार माधव; महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (२०१२); विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद पृ.क्र. ३६.
७.वाणी निता, कृषी अर्थशास्त्र (२०१२); प्रशात पब्लिकेशन्स, जळगांव पृ.क्र. १३३.
८.उपरोक्त पृ.क्र. १३३.



**वायसे गोवर्धन कल्याण**
अर्थशास्त्र विभाग, बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड.